**आर बी आय/ २००६-०७/ २१२**
संदर्भ क्र. डीजीबीए. सीडीडी. क्र. एच-९७४३/ १५.०१.००१/२००६-०७

डिसेंबर १८,२००६

अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
शासकीय लेखा विभाग, प्रधान कार्यालय
स्टेट बँक ऑफ इंडिया/स्टेट बँक ऑफ इंदोर/स्टेट बँक ऑफ पतियाळा /स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपूर/स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र /स्टेट बँक ऑफ त्रावणकोर/स्टेट बँक ऑफ हैद्राबाद/स्टेट बँक ऑफ म्हैसूर/अलाहाबाद बँक /बँक ऑफ बरोडा/बँक ऑफ इंडिया/बँक ऑफ महाराष्ट्र/ कॅनरा बँक/ सेंट्रल बँक ऑफ इंडिया/कार्पोरेशन बँक/देना बँक इंडियन बँक/इंडियन ओव्हर्सिज बँक/पंजाब नॅशनल बँक /सिंडिकेट बँक/युको बँक / युनियन बँक ऑफ इंडिया / युनायटेड बँक ऑफ इंडिया

प्रिय महोदय,

**विशेष ठेव योजना १९७५-**
**कॅलेंडर वर्ष २००६ साठी व्याज प्रदान**

कृपया आपचे परिपत्रक आर बी आय/ २००५/२३५ संदर्भ क्र. डीजीबीए. सीडीडी. १५.०१.००१/एच ८४००/२००५-०६ दिनांक डिसेंबर २०, २००५ चा संदर्भ घ्यावा. त्यात आम्ही आपणास, विशेष ठेव खात्यातील शिल्लक रकमेवर (बॅलेन्सेस), कॅलेंडर वर्ष २००५ साठी, ८% दराने व्याज देण्यात यावे असे कळविले होते.

२. या संदर्भात कॅलेंडर वर्ष २००६ साठीही, एस डी एस वरील व्याज दर बदलला नसून तो पुढील आदेश मिळेपर्यंत ८% असावा यास भारत सरकारनेही पुष्टी दिली आहे. आणि यानुसार आपणास सूचित करण्यात येते की, आपल्या सर्व ठेवी- कार्यालयांना , तेथील एस डी एस खात्यांवर, खातेदारांना, कॅलेंडर वर्ष २००६ साठी, ८% दराने व अकाउंट पेयी चेक्सने व्याज देण्यात यावे असे कळविण्यात यावे.

३. आमच्या डिसेंबर ३०, २००३ च्या परिपत्रकाच्या ( प्रत सोबत दिली आहे ) दिलेल्या सध्या लागू असलेल्या सूचनांची पुनरोक्ती करुन, आपण ठेवी असणाऱ्या आपल्या सर्व कार्यालयांना सूचना देऊन खात्री करुन घ्यावी की कॅलेंडर वर्ष २००६ मधील खातेदारांना द्यावयाचे व्याज जानेवारी २००७ च्या पहिल्या आठवड्यात दिले जाईल.
४. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू
(इम्तियाझ अहमद)
सहाय्यक महाव्यवस्थापक